# ११. जीवन गाणे

**नितीन देशमुख (१९७४) :** प्रसिद्‌ध कवी व लेखक. त्यांच्या विविध विषयांवरील काव्यरचना प्रसिद्‌ध आहेत. त्यांच्या काव्यातून निसर्ग व निसर्गापासून मिळणाऱ्या विविध गोष्टी यांवरील मार्मिक भाष्य आढळून येते.

निसर्गातील विविध घटक आपल्याला काही ना काही मूल्ये व संस्कार शिकवत असतात. प्रस्तुत कवितेतून कवीने निसर्गातील विविध घटकांकडून शिकता येणाऱ्या गोष्टी थोडक्यात पण मार्मिकपणे मांडल्या आहेत. प्रस्तुत कविता 'किशोर', सप्टेंबर २००९ या मासिकातूनन घेतली आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

या सृष्टीचे मंजुळ गाणे
जगणे मजला शिकवून गेले,
झिलमिलणारे चंद्र चांदणे
जगणे मजला शिकवून गेले!

भरकटलेल्या जगात नाही
संस्कारांची जाण कुणाला,
तुळशीवरल्या त्या पणतीचे
जळणे मजला शिकवून गेले!

प्रेम काय ते कुणा न ठावे
नदी सागरा जीव का लावे?
स्वैर होऊनी नदीचे पळणे
जगणे मजला शिकवून गेले!

बुलंद तरीही असे हौसले
पिल्लासाठी किती सोसले,
चिवचिवणाऱ्या चोचीमधले
दाणे मजला शिकवून गेले!

सागराची अथांगता अन्
ही वृक्षाची स्थितप्रज्ञता,
दुसऱ्यासाठी घाव सोसणे
जगणे मजला शिकवून गेले!



**शब्दार्थ : मंजुळ** – गोड. **ठाव (ठाऊक) नसणे** – माहीत नसणे. **बुलंद** – मजबूत, भक्कम. **हौसले** – निर्धार, ठाम विश्वास. **घाव सोसणे** – दु:ख सोसणे.



## स्वाध्याय

**प्र. १. आकृत्या पूर्ण करा.**

(अ) **कवीच्या अनुभवातले जग** → [ ] [ ]

(आ) **कवीला जगणे शिकवणारे कवितेतील घटक** → [ ] [ ] [ ] [ ]

**प्र. २. कवितेच्या आधारे खालील तक्ता पूर्ण करा.**

| कवीला जगणे शिकवणारे घटक | या घटकांपासून कवी काय शिकले |
|---|---|
| (अ) चंद्र, चांदणे | (अ) |
| (आ) पणती | (आ) |
| (इ) नदी | (इ) |
| (ई) पक्षी | (ई) |
| (उ) सागर, वृक्ष | (उ) |

**प्र. ३. स्वमत.**

(अ) 'बिनभिंतीची शाळा, लाखो इथले गुरु', हा विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(आ) 'दुसऱ्यासाठी घाव सोसणे', या ओळीतील तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.



**चर्चा करूया.**

- **निसर्गातील कोणत्याही पाच गोष्टींपासून तुम्हांला काय काय शिकता येईल, याविषयी मित्रांशी चर्चा करा व वर्गात सांगा.**

P7X7VN